**<u>नियमित दिवाणी मुकदमा नं.१३२/२०१७ मधील</u>**

**<u>निशाणी ७९ वरील आदेश</u>**

(**CNR NO.MHSI**04-000858-2017)

**(विष्णु नाईक वि. कांता नाईक व.३ )**

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचे बजावणी बाबत योग्य मुदतीत तजवीज न केल्यामुळे मे. न्यायालयाने प्रतिवादी क्र.३अ ते ३ड विरुध्द दावा खारीज करणेबाबतचा केलेला आदेश रद्दबातल करुन मिळणेसाठी दाखल केला आहे.

२. वादी यांच्या कथनानुसार, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द कायमची व आज्ञार्थी ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. परंतु, सदर दाव्यातील वादी यांच्या मुंबई येथे वास्तव्यास असलेल्या भावाच्या सततच्या आजारपणामुळे वादी यांना मुंबई येथे वारंवार जावे लागत असल्यामुळे त्यांना आपल्या वकिलांना भेटून प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांच्या बजावणीबाबत योग्य मुदतीत तजवीज करणे शक्य झालेले नाही. प्रस्तुतचा विलंब हा हेतुपुरस्पर नसुन भावाच्या आजारपणामुळे झालेला आहे. त्यामुळे, प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचेबाबत वादी यांनी तजवीज केली नसल्याने प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचेवरुध्द दावा खारीज करण्यात आलेला आहे. सदरचा आदेश रद्द न झालेस वादी यांचे अपरिमित नुकसान होणारे आहे. सबब, प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचेविरुध्द दावा खारीज करणेचा आदेश रद्दबातल होवून मिळणेस विनंती केलेली आहे.

३. प्रतिवादी यांनी निशाणी क्र.८० येथे आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जास हरकत घेतली आहे. प्रतिवादी यांचे म्हणण्यानुसार वादी यांनी प्रस्तुतचा खोटा व खोडसाळ अर्ज दाखल केलेला असुन, प्रस्तुतचा दावा हा सन २०१७ मध्ये दाखल केलेला असून, वादी यांनी दाव्याच्या कामी तजवीज न केल्याने प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचेविरुध्द दावा खारीज करणेत

आलेला आहे. प्रस्तुत अर्जास समर्पक असे कारण नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज व त्यावरील म्हणणे वाचून पाहिले. वादी व प्रतिवादी विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचेविरुध्द कायमची व आज्ञार्थी ताकीद मिळणेकरीता दाखल केलेला आहे. अभिलेखावर दाखल बेलिफ रिपोर्ट प्रमाणे प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांना दाव्याचे समन्स पाठविले असता, सदरचे समन्स निशाणी क्र.७६ अन्वये प्रतिवादी क्र.३अ, ३ब, व ३ड यांचे राहते घर बंद असुन, सदर प्रतिवादी हे मुंबई येथे राहत असल्याने व प्रतिवादी क्र.३क हे कणकवली येथे राहत असल्याने समन्स न बजावता परत आलेले आहेत. प्रतिवादी क्र.३अ ते ३ड ची तजवीज न केल्याने त्यांचेविरुध्द दि.०३.१०.२०२५ रोजी दावा खारीज करणेत आला. प्रस्तुतचा दावा हा ताकिदीकरीता दाखल केला असल्याने प्रतिवादी क्र.३अ ते ३ड हे प्रस्तुत दाव्यात आवश्यक पक्षकार आहेत. प्रस्तुत प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांना दाव्यात दाखल करुन न घेतल्यास एकाच विषयासाठी अनेक खटले (Multiplicity of Proceeding) होण्याची शक्यता आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा सन २०१७ मध्ये दाखल केला असून, सदर दावा हा ५ वर्षांपेक्षा जुना आहे. प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांना दाव्याचे कामी सामील केल्यास त्यांचे कोणतेही नुकसान होणारे नाही. याउलट दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेस मदत होणारी आहे. सबब, दिवाणी प्रक्रिया संहिता कलम १५१ मध्ये दिलेल्या न्यायालयीन अधिकारांचा वापर प्रस्तुत ठिकाणी करता येईल. सदर तरतुदींनुसार दिवाणी प्रक्रिया संहिता मधील कोणत्याही गोष्टीमुळे न्यायाचे उद्दिष्ट साध्य करण्यास किंवा न्यायालयीन कार्यवाहीचा दुरुपयोग टाळणेसाठी आवश्यक असतील ते आदेश

देण्याचा अधिकार प्रस्तुत न्यायालयास आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांना प्रस्तुत दाव्याचे कामी हजर होवून आपले म्हणणे सादर करण्याची संधी देणे उचित ठरेल.

**६.** माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.०३.१०.२०२५ रोजी निशाणी क्र.१ अन्वये आदेश पारीत करुन प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचेविरुध्द दावा खारीज केला होता. तद्नंतर दि.०६.०३.२०२६ रोजी वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुतचा अर्ज ५ महिन्यानंतर दाखल केला आहे. तसेच, वादी यांनी प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांची तजवीज करणेस विलंब केल्यामुळे प्रतिवादी यांचा तसेच न्यायालयाचा बहुमुल्य वेळ गेलेला आहे. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करतेवेळी वादी यांचेवर खर्च आकारुन अर्ज मंजुर करणे योग्य ठरेल. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| १. | वादी यांनी प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/–(रक्कम रुपये पाचशे मात्र) इतका खर्च देण्याच्या अटीवर अर्ज मंजुर करणेत येतो. |
| २. | वादी यांनी प्रतिवादी यांना खर्चाची रक्कम दिल्यानंतर प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचेविरुध्द झालेला दावा खारीज आदेश रद्द करेणत येतो. |
| ३. | वादी यांनी खर्चाची रक्कम पुढील तारखेपर्यंत किंवा तत्पुर्वी प्रतिवादीस अदा करावी. अन्यथा दि.०३.१०.२०२५ रोजीचा निशाणी क्र.१ वरील प्रतिवादी क्र.३अ ते ३ड यांचेविरुध्द झालेला दावा खाजीजचा आदेश जैसे–थे असल्याचे समजण्यात येईल. |
| ४. | वादी यांनी प्रस्तुत आदेशाची नोंद घ्यावयाची आहे. |

सही/–

दिनांक –२०/०७/२०२६.

(न. अ. बकरे)

सह. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर)

कुडाळ.